UGC List

ISSN 2229-4406

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education for all Subjects

# UNIVERSAL
## RESEARCH ANALYSIS

**EDITOR IN CHIEF**
**Dr. BALAJI KAMBLE**

# INDEX



| Sr. No. | Title of Research Paper | Author(s) | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | An Assessment of Maharashtra Employment Guarantee Scheme as A Tool of Poverty Alloviation | Dipak Chaudhari, Dr. Ashok Khachane | 1-7 |
| 2 | India's Trade with Saarc Countries | Kirankumar D. Thorat | 8-11 |
| 3 | Inflation : A Challenges Before Indian Economy | Dr. Suhas Avhad, Mohan B. Shinde | 12-16 |
| 4 | महाराष्ट्रातील सहकारी चळवळ व ९७ वी घटना दुरुस्ती | डॉ. सुहास आव्हाड | 17-19 |
| 5 | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) - एक दृष्टीक्षेप | दत्तात्रय धनू गव्हाणे | 20-22 |
| 6 | अनुसूचीत जातीच्या समस्या | कविता होन | 23-25 |
| 7 | भारताच्या आर्थिक विकासात परकीय प्रत्यक्ष गुंतवणुकीची भुमिका | डॉ. आर. के. दातीर, विनायक त. खातळे | 26-29 |
| 8 | महाराष्ट्रातील पंचायत राजची ५० वर्ष | सुहास सुदाम क्षिरसागर | 30-32 |
| 9 | ज्येष्ठ नागरिकांची लोकसंख्येतील वाढ व समस्या | डॉ.प्रमोदिनी कदम, मंगल जगताप | 33-36 |
| 10 | स्वातंत्र्योत्तर काळातील शेतीची वाटचाल | बाळासाहेब जयराम जाधव | 37-41 |

9

# ज्येष्ठ नागरिकांची लोकसंख्येतील वाढ व समस्या

*डॉ.प्रमोदिनी कदम*
अर्थशास्त्र विभाग,
एस.एम.बी.एस.टी. महाविद्यालय,
संगमनेर, जि. अहमदनगर

*मंगल जगताप*
संशोधन केंद्र, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,
स.म. भा.स. थोरात महाविद्यालय,
संगमनेर, जि. अहमदनगर

**Research Paper - Economics**

**प्रस्तावना :**

एकविसावे शतक हे मानवी विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे मानले जाते. या शतकात नवनविन तंत्रज्ञानाचा शोध लागला. त्यामुळे उत्पादन व्यवस्था बदलेली दिसून येते. याचा परिणाम पाहिले तर मानवी विकासाला ख-या अर्थाने महत्व प्राप्त झाले परंतू औद्योगिकरण, नागरिकरण आणि नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार केल्याने आर्थिक क्षेत्रातील परिवर्तनाचा परिणाम मानवावर व इतर घटकांवर झाला. यामध्ये नवीन जीवन पध्दती उदयास येवून तरुणपिढीमध्ये व्यक्तिवाद, व्यवसायिक गतिशीलता, व्यवहारवाद, नवनविन गोष्टींचे आकर्षण यामुळे परंपरेने चालत आलेली संयुक्त कुटुंब पध्दती ऱ्हास होऊ लागली. तसेच ग्रामीण भागातून शहरी भागाकडे स्थलांतराचे प्रमाण अधिक वाढून कुटूंबातील ज्येष्ठांकडे दूर्लक्ष होत आहे.

भारतात ज्येष्ठांची संख्या वाढत आहे. कारण दिवसेंदिवस वैद्यकीय क्षेत्रातील प्रगती व आयुवर्धमान तंत्रामुळे आयुर्मान वाढत असल्याने एकूण लोकसंख्येत ज्येष्ठांची लोकसंख्या वाढत आहे. भारतातील सन १९८६-९० या कालखंडात सरासरी आयुर्मान ५८ वर्ष होते. सन २०१०-११ मध्ये हे आयुर्मान ६४.७ वर्षापर्यंत् पोहचले. अशा प्रकारे लोकांचे अपेक्षित आयुर्मान वाढत असल्याने ज्येष्ठ नागरिकांची संख्या वाढत आहे. इ.सन. २००१ मध्ये भारताच्या लोकसंख्येत ६० वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त वय असणाऱ्या वृध्दांची संख्या ही ७.१ कोटी होती तर २०११ मध्ये वृध्दांची संख्या ८.० कोटी पर्यंत वाढली. ज्येष्ठ नागरिकांच्या संख्येत सातत्याने वाढ होताना दिसत आहे.

म्हणून अशा या ज्येष्ठ नागरिकांच्या वाढीच्या संख्येत परिणाम हा आरोग्यविषयक सेवा, सुविधा, निवृत्ती वेतन त्याच बरोबर सामाजिक सुरक्षा इत्यादी वरील खर्चावर होत आहे. आणि भविष्यात तो वाढत जाईल. त्यातून अनेक प्रश्न निर्माण होत आहे.

**संशोधनाची उदिष्ट्ये :**

१. ज्येष्ठ नागरिकांची संख्या व एकुण लोकसंख्येतील प्रमाण अभ्यासणे.

२. ज्येष्ठ नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध समस्या अभ्यासणे.

**संशोधनाची पध्दती :**

संशोधनाचा आढावा घेताना संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात आला की ज्यामध्ये दुय्यम तथ्य संकलन पध्दतीप्रमाणे ग्रंथालयीन पुस्तके, वर्तमानपत्रके, नियतकालिके, क्रमिक पुस्तके व विविध वेबसाईटच्या माध्यमाने माहिती संकलीत करण्यात आली आहे.

**ज्येष्ठ नागरिकांच्या लोकसंख्येतील वाढ :**

मानवी जीवनात जैविकदृष्ट्या वृध्दावस्था ही अपरिहार्य बाब आहे. इतके असले, तरी याव्यतिरिक्तही समस्या असल्याने वृध्दांची किंवा ज्येष्ठ नागरिकांची समस्या ही जैविक दृष्ट्या न राहता ती मानसिक दृष्ट्याही मोठ्या प्रमाणात जाणवू लागली. या कारणानेच अनेक देशांनी वृध्द किंवा ज्येष्ठ नागरिक म्हणून मानण्यासाठी जैविक दृष्टीकोनातून वय हा आधारभूत घटक मानला आहे. सुधारलेल्या देशात वृध्दाचे ज्येष्ठ नागरिकांचे वय कमीत कमी ६५ वर्ष मानले आहे.

भारत सरकारने 'ज्येष्ठ नागरिक' या संकल्पनेत ६० वर्षावरील व्यक्तीचा समावेश होतो. तर महाराष्ट्र शासनाने ज्येष्ठ नागरिकांची वयोमर्यादा स्त्रीयांसाठी ६० व पुरुषांसाठी ६५ इतकी मानली आहे. भारत सरकारने ६० वर्षे ही वयोमर्यादा गृहीत धरुन ज्येष्ठ नागरिक लोकसंख्येची आकडेवारी जाहिर केली आहे.

| वर्ष | ज्येष्ठ नागरीकांची संख्या (कोटी) | एकूण लोकसंख्येतील टक्केवारी |
|---|---|---|
| १९५१ | २.० | ५.७ |
| १९६१ | २.५ | ५.७ |
| १९७१ | ३.३ | ६.१ |
| १९८१ | ४.२ | ६.५ |
| १९९१ | ५.७ | ६.७ |
| २००१ | ७.१ | ७.६ |
| २०११ | ८.० | ८.० |

स्त्रोत : जनगणना अहवाल

वरील तक्त्यावरुन ज्येष्ठ नागरिकांच्या लोकसंख्येची आणि त्याच्या एकुण लोकसंख्येच्या

तुलनेत टक्केवारी वाढत असल्याचे दिसून येते. इ.स. १९५१ मध्ये ज्येष्ठ नागरिकांची लोकसंख्या केवळ २.० कोटी (५.७%) होती ती २०११ मध्ये ८.० कोटी (८.०%) इतकी झाली आहे.

**ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या :**

संयुक्त कुंटुबांचे विभाजन झाल्यामुळे वृध्दांची देखभाल होऊ शकत नाही. वृध्दांना आपल्या शेवटच्या टप्यात अनेक प्रकारच्या व्याधी किंवा आजार जडतात. आजही ४०% वृध्द गरीब असून ७३% वृध्द अशिक्षीत आहे. भारतामध्ये ८०% वृध्द ग्रामीण भागात राहतात. अशा वृध्दांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे त्या पुढील प्रमाणे.

**१. आरोग्य विषयक समस्या :**

वृध्दावस्था ही प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातील अनिवार्य बाब आहे. व्यक्तीच्या वयाबरोबर शारीरिक बदलही वाढत जातात. उदा. शरीरावर सुरुकुत्या पडणे, रोगप्रतिकार शक्तीचा ऱ्हास, हायपोथॅलामंस तत्व क्षीण होणे, मनावरील ताबा सुटणे, नेत्रदोष, श्रवणदोष, वाक्यदोष, मलावरोध, हृदय, किडनी, पचन संस्थातील बिघाड, अवयवांतील कार्यात बाधा निर्माण होते. या व अशा अनेक आरोग्यविषयक समस्या निर्माण होतात.

**२. मानसिक समस्या :**

वृध्दापकाळात मानसिक बदलही अपरिहार्य असतात. विचारक्षमता, ग्रहण क्षमता, कार्यक्षमता कमी होते. कुटुंबातील व जवळच्या व्यक्तींकडून होणारा अनादर लक्षात घेता चिडचिडेपणा, मनावरची ताबा सुटून व वर्तन काहीसे विक्षिप्त होते.

**३. आर्थिक समस्या :**

या अवस्थेत शारीरिक व मानसिक कार्यक्षमता क्षीण होत असल्यामुळे आर्थिक मिळकत होत नाही. व्यक्तीला इतरांवर अवलंबून राहावे लागते. मिळणाऱ्या मिळकतीमध्ये तिच्या गरजा पूर्ण होत नाहीत.

**४. सामाजिक समस्या :**

वृध्दांचा प्रश्न हा त्या व्यक्तिचा वैयक्तिक असला तरी सामाजिक स्वरुपाचा देखील आहे. कारण वृध्द व्यक्तींना इतरांकडून मिळणारी वागणुक, समुहाकडुन मिळणारी वागणुक काहीशी वेगळेपणाची असल्यामुळे त्या वृध्दामंध्ये मतभेद निर्माण होतात. त्यातून कलह व संघर्षात्मक परीस्थिती निर्माण होते.

**५. परावलंबनाची समस्या :**

वृध्दात्वाचा काळ हा परावलंबनाचा काळ म्हणुन ओळखला जातो. ज्येष्ठांना ते विशेषत: व्याधीग्रस्त अतसाना शरीरिक, मानसिक आधाराची गरज असते. विभक्त कुटुंबव्यवस्थेच्या पध्दतीमुळे ज्येष्ठ नागरिकांना मदत करण्याची वृत्ती कमी होताना दिसते. त्यामुळे त्यांच्या समस्यात वाढ होत

आहे.

वरील प्रकारच्या समस्या ज्येष्ठांना भेडसावताना दिसते.

**सारांश :**

प्रत्येक देशाने ज्येष्ठ नागरिकांच्या वाढलेल्या आव्हानांचा आणि समस्यांचा सामना सांस्कृतिक आणि पारंपारीक मुल्ये, राष्ट्रिय दृष्टिकोन लक्षात घेऊन आपली ध्येय-धोरणे ठरविली पाहिजे. ज्येष्ठ नागरिकांनी त्यांच्या जिवनामध्ये जगाच्या विकासासाठी आणि समृध्दीसाठी महत्वपुर्ण योगदान दिलेले आहे.

## संदर्भ सूची

१. आधुनिक भारतातील सामाजिक समस्या - डॉ. दिलीप खैरनार
२. सदाबहार वृध्दत्व - राम उगावकर
३. ग्रामिण समाजातील वृध्दांच्या समस्या - प्रा. जगन्नाथ कराडे
४. वृध्दांच्या समस्या : चिंता आणि चिंतन डॉ. दिलीप खैरनार
५. www. Census of india.com

## लेखकांसाठी महत्वाच्या सुचना

१) आपले मौलिक शोधनिबंध ते आम्ही सुचविलेल्याच नमुन्यामध्ये टायपिंग करून, त्याची एक प्रिंट कॉपी व एक सी. डी. फॉर्म सोबत द्यावी किंवा ई-मेलवर पाठवावी.

२) मराठी व हिन्दी भाषेसाठी **DVB-TTYogesh (Font size - 14)** चा वापर करावा.

३) इंग्रजी भाषेसाठी **Times New Roman (Font size - 12)** चा वापर करावा.

४) शोध निबंध हे सारांश आराखडा (Abstracts), Key words, Introduction, Objectives, Central Idea, Conclusion, Suggestion, Summery & References या प्रमाणे असावेत. आवश्यकतेनुसार नकाशे, टेबल व आलेखांचा वापर करावा.

५) आदर्श संदर्भ सूची ही पुढीलप्रमाणे असावी -
Authors Name, Edition (in Bracket), Book Name, Publication, Vol. No. Page No. या स्वरूपात असावी.

६) **शोधनिबंधासोबत आपला शिकवित असलेल्या विषयाचे नाव, विभागाचे नाव, महाविद्यालयाचा पूर्ण पत्ता, घरचा पूर्ण पत्ता, पिन कोड, फोन, मोबाईल, ई- मेल द्यावा ही विनंती**
वरील सुचनांचे काटेकोरपणे पालन करून संपादक मंडळाला सहकार्य करावे, ही विनंती.